# गोळ्या



संपादक श्रीयुत मनमोहन

किंमत आठ ढब्बू


ता. २२।११।३३
सन १९३३
६५५
काव्य
REFBK-0004951
REFBK-0004951

पूर्ण) केसाचे सौंदर्यासाठीं

व मेंदू शांत ठेवण्याकरितां पूर्ण स्वदेशी

—:वस्तूंपासून तयार केलेलें:—

# गुलाब हेअर ऑइल

आपल्या नेहमींचे उपयोगाकरितां वापरा. यांस परदेशी तेलाप्रमाणें उग्र वास येत नाहीं व केसही पांढरे होण्याची मुळींच धास्ती नाहीं. तर उलट केस काळे कुळकुळीत होऊन याच्या मधुर सुवासानें मनास प्रसन्नता प्राप्त होते! आजकाल परदेशी तेलापायीं पुष्कळ पैसा परदेशांत जातो; त्याचा बचाव करून त्याच तेलाचे तोडीचे "पूर्ण स्वदेशी" तेल वापरून स्वदेशी धंद्यास उत्तेजन देण्याची संधि घ्या. एक वेळ वापरून खात्री करावी. बाटली किं. ९ आणे.

## व्यापाऱ्यांस विशेष सवलत!!

माहितीसाठीं खालील पत्त्यावर लिहा:—

डेपो:—एम्. माळशिरस.

मिळण्याचें ठिकाण:—

गद्रे जनरल शॉप, पूना.

# अफूच्या गोळ्या

[ परवान्याशिवाय अफूच्या गोळ्या विकून म० गांधीच्या करबंदीच्या चळवळीला सक्रीय सहानुभूति दाखविणारे हिंदुस्थानातील एकच एक महशूर कारखानदार.]

## मिय्या और बिब्बी

( चाल—सलाम आलें हुकुम.)

कवि—श्री० शुर्पणखानाथ.

मी सातारी जर्दा मौजुद तू मद्रासी तपकीर ।
महालक्ष्मी नवरात्रांतिल हैदोसदुल्ला मी पीर ॥
मी पंजाबी मेल आणि तूं क्वीन पांढरी डेक्कनची ।
मी धोट्या अन् लाल राणि तूं शोभुन जाशी कॅरमची ॥
मी लॉरी तर न्यहाल प्यारी तूं अस्मानी ऑस्टीन ।
मी बाजाची बद्सुर पेटी तूं तर मामांचें बीन ॥
मी वांसा अन् बांबु आणि तूं हातांमधली वेतछडी ।
बाळाभाउंचा बाळ्या मी तर ठमाकाकुची तूं छबडी ॥
म्हाताऱ्याचा पेन्शनराचा वटवा मी अन् तूं चंची ।
मी कुंचा तर बिन् ठिगळाची रेशिमकांठी तूं कुंची ॥
नूतन मराठी शाळा मी तर हुजरातीची तूं पागा ।
बेलबाग तूं बुधवारांतिल पुलाकडेचा मी दर्गा ॥
मी खजिन्याची विहीर राणी आणि नळाची तूं तोटी ।
मथुरादासी दूधलोटि मी आणि जकाती तूं तों, 'टी', ॥
दिवा ग्यासचा भडक स्वतां; तूं देवापुढली फुलवात ।
मनोरमा तूं गोड चंद्रिका, मी सप्तर्षी विख्यात ॥

दिनानाथचें गाणें तूं तर मी पेंढारी ओरडणें।
कोजागिरिचें गायन तूं; मी शिमग्यामधलें बोंबलणें॥
अफझुलखांचें थडगें मी तर तूं त्या शिंद्यांची छत्री।
कत्तलखांचा सुरा स्वतः मी खिसेकापुची तूं कात्री॥
हारा मंडईतील शोभतो मी तर राणी तूं झोळी।
तंबाकूची फक्की मी तर तूं गांजाची दमूगोळी॥
मी गांधीचा पंचा आणि जवाहिराचें जाकिट तूं।
वर्तक साखर पूर्ण स्वदेशी मी तर कॉफी हो ना तूं॥
बुधवारांतील चौकखुलां मी रम्य शनीचा तूं पार।
सोलापूरचा चेक स्वतः, तूं पातळ रेशिम हळुवार॥
केशवपुत्राच्या रंगाचा कुमार मुंगळा मी (तूं) मुंगी।
मी मेघाचा कृष्णपसारा इद्रचाप तूं वहुरंगी॥
तुमान सरदारी मी राणी तुजला उपमा चड्डीची।
ढब्बू छब्बू पैसा मी तर तूं गे चवली चांदीची॥
मी लिप्टनचा चहा दिलावर तूं दिल्लीची टॉफी।
कृतघ्नतेचा गंडा मी तर, कृतज्ञतेची तूं राखी॥
मृदंग डग्गा मी बलहारी तर तूं कृष्णाची मुरली।
मी चकणा जर दो डोळ्यानें, बरी शोभशी तूं तिरळी॥
मी मुंबईचा गिरणीवाला शेट आणि तूं गोव्याची।
मी चांफा तर तूं हो अक्का सदर्न मराठा करविरची॥
मी जर चरका जोड लांकडी, गरगर फिरशी तूं टकळी।
गिरिश पूजेचा शंख स्वतः तूं संध्येमधली ताम्रपळी॥
अफु गांजा मी अम्मलदारी, तुळशीमधली तूं भांग।
ममती पवळी धामण तूं तर दौलतजादा मी मंग॥
सह्याद्रीचें पठार मी तर माळावरची तूं माती।
मी 'रत्नाकर' नावर तूं तर मासिक वाही 'स्त्री' सुमती॥
मी फडक्यांच्या निरंजनासा तूं तर रागिणि जोशांची।
मी फडक्यांची धाडसवृत्ती, सात्विकता तूं गांधीची॥
पेनबाम मी अर्धशिशीवर सार्सापरिला तूं लाल।

सुत्तरफेणी शुभ्र गोड मी म्हातारीचे तूं बाल ॥
शेतकऱ्याचें मी मुंडासें अंगरखा हो तूं गहिना ।
गायकवाडचा बुड्ढा पोपट न. चिं. के. तर तूं हो, मैना ॥
मी तंबोरा 'भोप्या' हांतिल 'केतकरांची' तूं तान ।
मालमसाला मी पट्टींतिल तर तूं मानाचें पान ॥
गोहर तूं हो बिलिमोरीया 'मी' चित्रपटांतिल गुलजार ।
मी काद्यांचा खमंग रस्सा अमसूलाचें तूं सार ॥
बाजिराव मी शेवटचा तर जहांपन्हां तूं मस्तानी ।
बंगाल्यांतिल 'स्पिरीट' मी, तूं 'प्रतियोगी' हो पुण्य जनीं ॥
शंभूराजा मी रंगोजी, तूं हो तुळशी रंगेल ।
संत्रें मोसंबें चिक्कू तूं वसईकडलें मी केळ ॥
स्फूर्ती शरिरांतील मदालस मी तर तूं हो गे शक्ती ।
सभापती मी केळकरांसा गें तर तूं हो उपवक्ती ॥
बोरिक ॲसिड मी तर राणी गंपलासची तूं पट्टी ।
इंजिनमधलें बॉयलर मी तर सोनाराची तूं भट्टी ॥
निवडुंगाचें बोंड राजसें मी तर तूं गे कुंदकळी ।
मी सरडा हो वळचणिच्यांतिल पाल राणि तूं सोनसळी ॥
इंदूराचा नरेश मी अन् हृदयराणि तूं मुमताज ।
सुवर्णमंचक मुलायमीं तूं बाळंतिणिची मी बाज ॥

*　　　*　　　*

जें जें सगळें उत्तम उत्तम टाकुन तुझिया पदरांत ।
सुधें कलंदर तुलाच नेइन जिंकुन अपुल्या गेहांत ॥
उपमांची खैरात कराया बुद्धि बिलंदर पाहतसे ।
ओळ वाढता पेज वाढतें आणि छपाई वाढतसे ॥
शुर्पणखेचा नाथ विनवितो वाचकरूपीं रामाला ।
दे पदराच्या चाट स्वतःच्या, नको सखीच्या नाकाला ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रा. क्र. ४८५१

# दे चुंबन राणी—

कवि--श्री० **मदनमस्त.**

ही कवितासुता म्हणजे श्री० माधवराव पटवर्धनांच्या " तेथें चल राणी "ची वहकलेली वडील वहीण आहे. आपल्या धाकट्या बहिणीप्रमाणेंच ही 'भिल्लीण' वृत्तांत नाचूं पहाते आहे.

( तसें म्हटलें तर ही कविता 'सीरियस' आहे, नाहीं म्हटलें तर नाहीं—)

आढे अन् वेढे नि कशाला वनमाले?—हे नाजुक चाळे!।
आतूर मनाला न रुचे संयमवाणी—दे चुंबन राणी ॥ १ ॥
हृदयास पटे ओळख आतां हृदयाची--पर्वा न जगाची।
शशि शीत शलाकांत म्हणूं गज्जलगाणी—दे चुंबन राणी ॥ २ ॥
मुखचंद्र तुझा त्याहुन उत्फुल्ल हसावा—सापेक्ष दिसावा।
मी काय पहावें तंव सौंदर्य दुरोनी--दे चुंबन राणी ॥ ३ ॥
संसार महासागर हा मच्छ विषारी--करि दंश जिव्हारी।
अधरामृत त्यांस तुझें औषधपाणी--दे चुंबन राणी ॥ ४ ॥
ओंठास भिडे ओंठ यदा प्रेमनिनादीं--लागेल समाधी।
अवधान न राहील तुझें भूक तहानीं—दे चुंबन राणी ॥ ५ ॥
मद्यार्क दिसे सुंदर आरक्त तथापी—त्या मानव शापी।
उन्मादक तूंहि कटाक्षांत हिमानी--दे चुंबन राणी ॥ ६ ॥
तारुण्य नसे शाश्वत दुनियेंत कुणीही—ही जोबनशाही।
कां दवडुन काळ वृथा होशि दिवाणी--दे चुंबन राणी ॥ ७ ॥
ही रात्र करीं भूवरि अंधार कशाला--शृंगार नभाला?।
चंद्रासह रंगमहालांत शिरोनी—दे चुंबन राणी ॥ ८ ॥
विझवील रवी येऊन रागें गृहसाला--उजळील उषेला।
व्यवहार सुरू होइल एकान्त सरोनी--दे चुंबन राणी ॥ ९ ॥
संयोग खरा सौख्यद हो यौवनभागीं--तूं काय अभागी?
सलगीस्तव प्रार्थि तुझा भक्त इमानी—दे चुंबन राणी ॥ १० ॥
डोलींत बसे पोपट-मैना सहकारी--स्नेहार्द विचारी।

त्यांचीच बरी सोबत अन् प्रेमळवाणी--दे चुंबन राणी ॥ ११ ॥
गौरांग तनू त्यावर ती मखमल लाली--रंगे वरखालीं ।
ही मोर पिसाऱ्या परि रंगेल जवानी--दे चुंबन राणी ॥ १२ ॥
पैशास्तव चाले न इथें हातचलाखी--राजा नि गुराखी-
एकत्र करी वास पहा एक जुटीनीं—दे चुंबन राणी ॥ १३ ॥
"भुलवून मला येसि इथें दूर कशाला?"--हा प्रश्न कशाला?।
शत्रू न तुझा कीं तुज मारीन पराणी?—दे चुंबन राणी ॥ १४ ॥
रोषांत नको स्फुंदु अशी, संशय कांहीं--आला तुज पाही।
हृत्ताप विजे फक्त तुझ्या अश्रुजलांनीं—दे चुंबन राणी ॥ १५ ॥
मी कोण कुणाचा? न जरी ठाऊक कांहीं--पर्वा न तरीही।
बघतांच तुला कामिनि घे धाव त्वरेनी—दे चुंबन राणी ॥ १६ ॥
सरदार कुळांतील असे दौलत, दाता—दे रूप विधाता।
खर्चीन तुझ्याखातर लाखावर नाणीं—दे चुंबन राणी ॥ १७ ॥
या मुक्त अशा केशकलापांत नवाई—मी गुंतुन जाई।
म्हणतेस कशी 'जाइ दुरी' पांख धरोनी--दे चुंबन राणी ॥ १८ ॥

---

## वंचनेचा जोडा—

(वृत्त--इश्के दमास्कस.)

कवि--श्री० बगदादनो बुल्बुल्.

(ही कविता वाचतांना श्री. पटवर्धनविरचित 'फारशी मराठी कोश' जवळ असू द्यावा.)

पत्रांतुनी कितींदा, केलीस याचना तूं।
मज्कुर वाचतां तो, येतात अश्रु ओतूं॥ १ ॥
पेटींत मख्मली यां, गुल्नार वाहिलेला।
निर्माल्य होउनिया, प्रेमासमान गेला ॥ २ ॥
पूर्वील याचना अन्, बेताल वंचना ही।
"विश्वासघातकी तूं", सांगें खुल्या जगाहीं ॥ ३ ॥

राखावया खुशामत्, हमेश मी तयार।
होतो उभा तरीही, केलास घाय वार ॥ ४ ॥
अव्हेरिशी खऱ्याला, वस्ताद तूं शहरची।
इष्कांत ठेवशी तूं, दोस्ती कलंदराची ॥ ५ ॥
" तुमच्याविना उदारा, दुनियाशुनी सहारा "।
वदलीस चुंबुनीयां, वर्षीत अश्रुधारा ॥ ६ ॥
नक्राश्रु काय ते गे ? कां ती हमी मुलामी ?।
इष्कांतली न सोसे, माझी तुला गुलामी ॥ ७ ॥
सौंदर्य नागिणीचें, अन् प्रेम कंचनींचें।
तुझ्याहुनी निराळें, नाहीं बनावटीचें ॥ ८ ॥
हिमशुभ्र अंगकांती, कलिजा परंतु काळा।
ठाऊक ना मुळींही, कसला असे जिव्हाळा ॥ ९ ॥
मौजेंत संगतीनें, आलों कितीक दूर।
माघार घ्यावयाला, आतां मला न धीर ॥ १० ॥
हृदयाब्ज वाहिलें मी, पायी तुझ्या सलामत्।
ही मान वांकविली, तूं तार मार बेशक् ॥ ११ ॥
विश्वासुनी तुझ्या मी, स्वाधीन प्रेम केलें।
अतृप्त भाव माझे, प्रेमा सदा भुकेले ॥ १२ ॥
तारुण्य हें सुखाचें, अल्पायुषी वसन्ती।
कलहात काळ प्यारी दवडूं, नकोस कान्ती ॥ १३ ॥
हा काळ धांवतांना, मारी जिवाशिवाला।
कां ? गैरसमजुतीनें, अव्हेरिशी प्रियाला ॥ १४ ॥
तूं मानिनी जशी गे, मीही नसे भिकारी।
श्रीमंतीची बढाई, कढूस होय भारी ॥ १५ ॥
त्वांही दिला इषारा, " घ्या बाहुचा निवारा "।
आतां दुरावशी कां, हृदयस्थिता उबारा ? ॥ १६ ॥
शृंगार रोमरोमीं, खेळे असे उभा मी।
पटगांठ सोडण्याची, ही वेळ फार नामी ॥ १७ ॥
डोळ्यांत वीज नाचे, देती अहा इषारा।

चांचल्य चारुतां ही, बोलाविते विहारा ॥ १८ ॥
एका क्षणांत सारी, हो गांठ भेट आणी।
आकर्षिलें सुधे तूं, बांधा भला जनानी ॥ १९ ॥
सौंदर्य स्वर्गिचें हें, आव्हानितें जगाला।
रंभा नि उर्वशीचा, तूं गर्वहार केला ॥ २० ॥
'अस्पृश्य' तूं तरीही, मन मंदिरांत येशी।
सुखसंगमास कां गे, इन्कार हा करीशी ॥ २१ ॥
उभयान्वयी तहाच्या, ठरवूं अटी खुषीनें।
होईल दिल्‌जमाई, भ्रांतिघ्न चुंबनानें ॥ २२ ॥
पण लाव कांहिही तूं, जिंकीन ताकदीनें।
हृदयंगम प्रतापी, बुद्धी दिली प्रभूनें ॥ २३ ॥
तस्‌बीर टांगलेली, राणी तुझी समोर।
हे बाण मारतात, डोळे तुझे टपोर ॥ २४ ॥
न्याहाळता मजाही, युग हो क्षणासमान।
उत्तेजतात आशा, लोपून जाइ भान ॥ २५ ॥
थरकांप अंतरीचा, अश्रू प्रदर्शितात।
ही कौतुकार्ह प्रीती, लावी गळ्यास तांत ॥ २६ ॥
प्रारंभिच्या सुखाला, भाळून जीव गेला।
भवितव्यता अशीही, होणार कोण वदला? ॥ २७ ॥
बस् ही पुरे भुलावण, होईन मीही वेडा।
आतां अखेरचा दे, पर्वाइनें निवाडा ॥ २८ ॥

# संगीत श्रीमुखांत !

( वृत्तः-सुनाट )

कवीयंत्री—सौ. **माधुरी मधुकरी**.

"... आणी नांव तिचें प्रभावति ÷ सुळें; आहे पुण्याचीच ती ।
ऐशी सुंदर ! काय देउं उपमा ! रंभा म्हणा वा रती ॥
* रँले गाडिवरी बसूनि फिरता भारीच ऽ मारू दिसे ।
केली ओळख मी कशीतरि अतां = जालीम दोस्ती असे ॥
भाऊ एक तिला, वसंत म्हणुनी वीशींतला धांद्रट ।
बाँबेला असतो, तयास म्हणतें ती नेहमी उद्धट ॥
त्याला – चिक्टवुनी दिला अलिकडे कुल्र्यास कोठेंतरी ।
आहे सामिल तोहि यांत; म्हणुनी ये भोगता ही परी ॥
पोस्टाचा थकला शिपाइ, तिकडे तीं प्रेमपत्रें पहा ।
होती याहुन जास्त काय तिजला माझा निजध्यास हा !
जातो मीहि नि येत तीहि सदनीं होतों चहा आग्रह ।
बापाचा मज बाबतींत पुरता अनुकूल आहे ग्रह !"
एटींकेट, झुगारुनी उधळला श्रोता वसंताच तो ।
संगित् घेवुनि श्री मुखांत पडला प्रेमी उताणाच तो ॥

---

# फासावर चढला गुप्त

**चाल**—उद्धवा सांतवर्न कर जा.

कवि—श्री. **दोरावजी सोरावजी.**

( ही कविता वाचून ज्याचे दंड फुगणार नाहींत त्यानें स्वतःला क्षय झाला आहे असें समजावें. —श्री. **मनकवडे शास्त्री.** )

दश दिशा निराश्रित होती–कक्षेंतून दिग्गज ढळतां ।
शशि शीत शलाका ठरती-निस्तेज, सूर्य संभवतां ॥

---

÷ दाताच्या सुळ्याशी याचा कांहीं संबंध नाहीं; * दिल्लीची म्हैस जशी पुरभय्याची तशी या नांवाच्या मोर्तबाची सायकल कॉलेज स्टूडंट्सची आवडती असते. ऽ उच्चार सादृश्य असलें तरी या 'नाजूक' शब्दाचा मारामारीशीं संबंध नाहीं. = सेलीम ज्या जहरानी मारला गेला त्याचें विशेषण. – वशिल्याच्या डिंकाचा उपयोग या कामी अक्कलेच्या सरसापेक्षा जास्त होतो.

सिंहासन कांपित होतें–क्रांती जन्माला येता।
जित होतीं जेते, जेव्हां, स्फूर्ति दे शक्ति नरासिंहा ॥
उघड्या डोळ्यानें तेव्हां।
स्वातंत्र्य देविचा भक्त–फासावर चढला गुप्त ॥ १ ॥

घेउनी तराजू हातीं–बोटींत फिरंगी बसला।
हिंदू नि मुसलमानांत–कलहानल तै चेतविला ॥
माजतां दुही दोघांत–विजयाला वरिता झाला।
चित्तांत आस राज्याची–डोक्यांत बुद्धि स्वार्थाची ॥
शमविली भूक सत्तेची।
तो दगलबाजिचा वख्त–फासावर चढला गुप्त ॥ २ ॥

भूतो न भविष्यति होता–म्हैसुरचा वाघ जिवंत।
शेवटल्या ऐश्वर्याचा–बापूही शक्तीमंत ॥
लढुनिया युद्ध धर्मानें–जाहले पराजित संत।
ती तेढ मना लागून–उठला हा आवेशून ॥
सुखभोग सर्व विधून।
कीर्तीहि असें अनुरक्त–फासावर चढला गुप्त ॥ ३ ॥

साहसी मनोवृत्तीचें–धाडसी निघाले वेगें।
आवेशुनि तुटुनी पडले–गर्जना करोनी घे! घे! ॥
धुमधडडड धडडड झालें–रक्तानें कालिज रंगे।
सूडाची शमली आग–प्रकटला तिथें अनुराग ॥
डोलाया लागे नाग।
ऊर्जस्वल, विजयासक्त–फासावर चढला गुप्त ॥ ४ ॥

बंदिस्त 'महात्मा' जैसा–ठायिं ठायिं दिसला मूर्त।
बंदिस्त 'जवाहिर' जैसा–ठायिं ठायिं दिसला मूर्त ॥
स्वर्गस्त भगतसिंग तैसा–सांभाळी अपुली शर्त।
शौर्यता जयाची थोर–झुंजले समर घनघोर ॥
दुर्दैव परी अनिवार।
होई न परी संतप्त–फासावर चढला गुप्त ॥ ५ ॥

उत्तरेस धडकी भरवी—घोडदौड संताजीची ।
इंग्रजास निष्प्रभ ठरवी—वाघीण शूर झाशीची ॥
आजही दरारा देई—कल्पना भगतसिंगाची ।
इतिहास विभूषित केला—निज रुधिर शाइनें लिहिला ।
हातांत तिरंगी धरिला ।
चौफेर पहारा सक्त—फासावर चढला गुप्त ॥ ६ ॥
एकेक रक्त बिंदूचे—शत अहीमही अवतरले ।
अस्तंगत रणशूरांनीं—शत वीर इथें प्रगटविले ॥
मारिलें परंतु न मेले—कीर्ति रूपानें जगले ।
कोंडलें जरी शरीराला—मारिलें जरी देहाला ॥
मारी न मृत्यु इच्छेला ।
आजही आठवे गुप्त—फासावर चढला गुप्त ॥ ७ ॥
मृत्यूच्या दाढेवरती—आधीच दिलें पाऊल ।
आप्तइष्टमय प्रेमाची—आधीच झुगारून झूल ॥
देशभक्त, भक्तीसाठीं—मृत्यूची घेई भूल ।
एकांत गोड स्वर्गीचा—निःसंग मार्ग मोक्षाचा ॥
शांतीचा आणि सुखाचा ।
म्हणुनिया जाहला लुप्त—फासावर चढला गुप्त ॥ ८ ॥
स्वर्गातिल देवेंद्रांनों—सांभाळा प्राणविसावा !।
भोगले हाल कैदेचे—द्या पूर्ण तयास विसावा ! ॥
अवतार घेवुनी फिरुनी—हिंदला दिनेश दिसावा !।
लढला जो ध्येयासाठीं—जीवदान, देशासाठीं ॥
पोवाडा त्याच्यासाठीं ।
जाहले बद्ध मनमुक्त—फासावर चढला गुप्त ॥ ९ ॥

---

## अंधारातला भाला

( चालः—आबराईतल्या पोपटपंचीची )

कवि—श्री० लॉक्कॉसवाला.

चित्रपटातिल ' दोघामधला ' शृंगारिक भाव ।
पाहुन आपण दोघांमींही रोमांचित व्हाव ॥

आलिंगुन वल्लभा अर्पितें चुंबन उच्छाहें ।
तोहि तिला ओढतों पुन्हा, हें चित्र रम्य आहे ॥ १ ॥
हृदयांमधल्या सुप्त भावना हलूं लागल्या खळबळुन ।
अंधारांतुन त्या मदनानें बाण दिलें सोडून ॥
तारुण्यांतिल जीवन दुःखद ' ती ' ' तो ' नसतानां ।
पैसा, सत्ता, सौख्य तयाविण तोषद भासेना ॥ २ ॥
प्रेमाची बरसात चालतें अशा स्थळी जावें ।
युवयुवतिनीं आणि स्वर्गिचें सौख्य अनुभवावे ॥
जिवाशिवाची एक मेळणी चित्ररूप दावी ।
अनुकरणाची इच्छा उद्‌भूत मनोमनीं व्हावीं ॥ ३ ॥
आणि संपता खेळ, आपुला मेळ जमायाचा ।
तरुणपणीच्या माझ्या हौशीं तू पुरवायाच्या ॥
जाइजुईचा साज स्वहस्तें चढवावा केशीं ।
संगर झालें मदनोन्मादे, अन् तू हृशिकेशीं ॥ ४ ॥
स्तब्ध शांतता गृहीगृहीचिं मालवले दीप ।
इतर ठायिचें ' तों ' 'तीं' निजलें श्रांतमनें चीप ॥
अशा रात्रिच्या उत्तर भागीं, आपण अनुरागीं ।
रति प्रसंगीं मंचकमार्गी व्हावें समभागीं ॥ ५ ॥
निज हस्तानें ममकटि धरुनी गांठ कंचुकींची ।
हळुवारीनें तू सोडावी, तेढ सजिवतेची ॥
उचलुन, घ्यावी तनुलतिका तव तोंड कुरवळावें ।
प्रणयसंगरीं जीवन मजला सुखकरसें व्हावें ॥ ६ ॥
ओठाला लागलें ओंठ अन् दृष्टीला दृष्टीं ।
सुंद जिवाला क्षणभर पडला विसर, स्वर्ग सृष्टी ॥
लग्ना आधिच आयुष्याची रंगवीली मी नाट्यकथा ।
आज परंतू स्मृति हो दुःखद, जीवन भासें गानकथा ॥ ७ ॥

# फेकला तटाहुन जोडा !

( चाल:—हे कार्टे माझें निजलें. )

कवी श्रीः--**सौ. परदेशी थिवारी.**

संन्डेची होती सुट्टी, मारीली न त्यानें बुट्टी।
स्टूडंट फर्ग्युसन् मधला, श्रीमंत आणखी हट्टी ॥
वीशीतिल तरणा बांड, प्रिय सखीविण होता कष्टीं।
होवोनी रॅले स्वार, गर्दीतुन बेदरकार ॥
गाठिला तयें बुधवार।
तेथंच उतरला थोडा, फेकला तटाहुन जोडा ॥ १ ॥
जाऊनी 'महाराष्ट्रांत', घेतली मिसळ पहिल्यानें।
जन्मुनी महाराष्ट्रांत, आम्लेट खाइ नेमानें॥
विश्वास महाराष्ट्रांचा, तरतरी येइ चाहानें।
पांसिग शो ओढित होता, पांसिग शो देखत होता ॥
रंगलां तिथे तो पुरतां।
मागविला त्यानें सोडा, फेकला तटाहुन जोडा॥ २ ॥
केरमचा होता तेथें, मांडला संच ओनरनें ।
होती न तयाची हौस, परि नशिबीं आलें करणें ॥
चँपीयन नातू नव्हतां, खेळत कीं खेळां बघणें ।
दुर्लक्ष करोनी तिकडें, तो पाहीं इकडे तिकडें ।
रस्त्यांतिल टांगे घोडे ।
प्रेमाध बनें तो थोडा, फेकला तटाहुन जोडा॥ ३ ॥
इतुक्यात तयाला दिसली रस्त्यांत रुपमति एक ।
नखरा तर पूर्ण पुणेरी, पावडर अन् न्सोचा झोक ॥
गहिऱ्या नजरेची होती, वर्ण, कीं कलिगंड खाप ।
हा तरणा बांडा पोर, ती तरणी चंद्रचकोर॥
प्रेमाचा महिमा थोर।
हटयोगि तपस्वी सोडा ! फेकला तटाहुन जोडा ॥ ४ ॥

चुकविलें धाइनें बील, सूंसाट येइ बाहेर।
लागला पाठलागाला, लांडोरी मागें मोर॥
अंबाडा चक्कर मोठें, न्याहाळित चाले चोर।
वेणीतिल फूल गळालें, ते तिलाही नाहीं कळलें॥
तें हळूच हातें उचलें।
सुंदरिनें केला वेडा, फेकला तटाहुन जोडा॥ ५॥
बुधावारही गेला मागें, 'किर्लोस्कर' गेले मागें।
शाळाही थोर पुण्याची, गेली सरकोनी मागें॥
पाठलाग करतानां हा, मदनमस्त तरणा भागें।
ध्यानांत तिच्या मग आलें, पाठीशी कुत्रें चालें॥
अबलेंचे चित्त न चळलें।
ओलांडुन नाना वाडा, फेकला तटाहुन जोडा॥ ६॥
त्यापुढतीं 'शनवार वाडा', विख्यात सात बुरजांचा।
पहिल्या बाजीरायाचा, अन् भरारि राघोबाचा॥
त्या कुटिला आनंदीचा, शेवटल्या ऐश्वर्याचा।
शत्रूनें करिताची चाल, मुकव्यांची करुनी ढाल॥
परतवू पाहि जों बाळ?
त्याचाहि गाइ पोवाडा, फेकला तटाहुन जोडा॥ ७॥
तिज पहावयाचा होता, शिरलीं ती दाउन पास।
निरुपाय जाहला याचा, पासाविण ना च प्रवेश॥
खालीच अपेक्षित तिजला, हा बसला, संथ विशेष।
पुंगीस नाग नादावें-दीपासिं कीट झेपावें॥
रूपावरि चित्त भुलावें।
मदनाचा दुसःह पगडा-फेंकला तटाहुन जोडा॥ ८।
पाहून खालचा भाग-तीं चढली वरती युवती।
इतिहास आठवे तिजला, चित्तांत जाहलीं कष्टीं॥
स्वातंत्र्य पूर्विचें स्मरतां, डोळ्यांतुन होई वृष्टीं।

'विश्वास' पूर्विचा शूर, आठवला तिजला थोर ।।
मिस्कील आजचा पोर ।
तो पेढा अन् हा काढा, फेंकला तटाहुन जोडा ।। ९ ।।
बुर्जावर येता; खालीं, सहज जों बघाया लागें ।
तो छुद्रा कुत्रा दिसला, आरक्त जाहलीं रागें ।।
उंचावुन अपुली मान, शेपूट हालवूं लागे ।
डोळ्यांची निर्लज्जानें, केलीन खूण ऐटीनें ।।
मारिला तिने नेमानें ।
सरकाउन मागें थोडा, फेंकला तटाहुन जोडा ।। १० ।।
तो लाल पुणेरी जोडा, मजबूत त्यातुनी नाल ।
लागला मधोमध माथीं, रक्त ये भरुन घंगाळ ।।
तो दुसरा मागोमाग, मारिला तिनें, गरनाळ ।
जोरानें आला होता, माथ्यांवर बसला पुरता ।।
गुंजाळहि मेला असतां ।
अंगानें हा तर लुकडा, फेकला तटाहुन जोडा ।। ११ ।।
पहिल्या घावानें अर्धा, दुसऱ्यानें पुरता मेला ।
मोटारीं एजन्टाचा, धावोनी आला मेळा ।।
वाजंत्री आणुन त्यानीं, तरूणाचा मुडदा नेला ।
व्याकुळला ज्ञानप्रकाश, मेघाळुन जाइ अकाश ।।
जनकाला लागे शोष ।
प्रेमाचा आटे ओढा, फेंकला तटाहुन जोडा ।। १३ ।।
त्या फुटक्या बुर्जापाशीं, तो भूत होउनीं बसला ।
त्या फुटक्या बुर्जापाशीं, तो खविस होउनी बसला ।।
त्या फुटक्या बुर्जापाशीं, तो जोडा खाऊन मेला ।
अपरात्रीं येता जातां, दिसतो तों अजुनी पुरता ।।
वेड्यापरिं वागें आतां ।
युवकाचा केला हुरडा, फेंकला तटाहुन जोडा ।। १४ ।।

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं.

## मज नको ग आय्. सी. एस्. !!

( चाल:—बद्चाल )

कवि—सौ० **मालतीबाई मॉय गॉड.**

पुरली ग हौस, मज नको ग आय. सी. एस. ॥धृ०॥

उंच टाचेचा बूट घालुनी, ।
चल म्हणतो मज भर गर्दीतुनी ॥
ना तरि मारी त्याच बुटानी ।
पति सुख नाश, मज नको ग आय्. सी. एस्. ॥ १ ॥

टाक पुसून ते कुंकू पॅरी ।
आज बॉलला जावू जारीं ॥
मडमेपरि घे झबलें तनुवरि ।
संस्कृति नाश–मज नको ग आय्. सी. एस्. ॥ २ ॥

मज बाळाची हौस; हवेसें ।
संतति नियमन त्यास हवेसें ॥
घालति 'टोपीं', मारुनि पशुसे ।
संतति नाश, मज नको ग आय्. सी. एस्. ॥ ३ ॥

मडमांच्या तीकडील पत्रिका ।
दर डाकेला येति नव्हे का ? ॥
पत्रोत्तरीं हें धाडिति पैका ।
पैसा नाश, मज नको ग आय्. सी. एस्. ॥ ४ ॥

सिगारेटचा धूर सदोदित ।
अन् दारूचें व्यसन नवोदित ॥
चुंबन भार्गी दर्पे त्रासत ।
सासुरवास, मज नको ग आय्. सी. एस्. ॥ ५ ॥

काय करूं त्या मोटारीला।
चाकर नोकर जरि दिमतीला ॥
विषय वासना ना नवऱ्याला।
फाल्गुनमास, मज नको ग आय्. सी. एस्. ॥ ६ ॥
पगार मोठा खर्चेहि मोठा।
काडीभरहि ना करि सत्ता ॥
उठतां बसतां पाठित लत्ता।
घेइन वीष; मज नको ग आय्. सी एस्. ॥ ७ ॥
अशिक्षिताला वरिले असते।
तरि जन्माचे सार्थक होतें ॥
संसारातिल सुखही वरिते।
ही-जडा इश्श्, मज नको ग आय्. सी. एस्. ॥ ८ ॥

REFBK-0004951
REFBK-0004951

— समाप्त —

४९५१

धी न्यू पूना सायकल

# रिपेअरिंग मार्ट

येथें सायकली व स्टोव्हज काळजीपूर्वक
रिपेअर करून दिलें जातील. तसेंच
त्यांस लागणारें सुटे भाग
स्वस्त भावांत विकत
मिळतील.

नव्या कोऱ्या सायकली भाड्यानें
दिल्या जातात, कायमच्या
गिऱ्हाईकास माफक
सवलत.

सदाशिव पेठ नंबर २
भिकारदास मारुती, रोड.